ePaper

## मंगेश सातमकरांचा एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश



| वर्ष - 7 | अंक - 88 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 29 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- रोहित शर्माचा ढोंगीपणा
- धनुषला व्हायचं शेफ
- इंडियाचे 20 नेते मणिपूरला
- आपण क्षुद्र किंवा नालायक

## पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीमार्फत शहरातील 5 लाख हून अधिक मालमत्तांचे सर्वेक्षण पूर्ण

# स्मार्ट सिटी मार्फत मालमत्तांचे सर्व्हेक्षण!

### महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची माहिती: महसूलात वाढ होण्यास मदत होणार

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिका अंतर्गत येणा-या सर्व मालमत्तांचे जी.आय.एस./GIS (भौगोलिक माहिती प्रणाली / GEOGRAPHICAL INFORMATION SYSTEM) सर्वेक्षण स्मार्ट सिटी मार्फत हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पांतर्गत शहरातील ५ लाखांहून अधिक मालमत्तांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. जीआयएस डेटा पीसीएमसी बांधकाम परवानगी विभाग आणि पिंपरी चिंचवड महापालिका मालमत्ता कर विभाग यांच्याकडे उपलब्ध असलेल्या डेटाशी जोडला जाणार आहे. यामुळे अधिकृत आणि अनधिकृत मालमत्ता ओळखता येतील. अशा मालमत्तांची ओळख पटल्यानंतर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मालमत्ता कर महसूलात वाढ होईल, अशी माहिती आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांनी दिली.**



पारदर्शक प्रशासन व नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी पिंपरी चिंचवड मनपा व स्मार्ट सिटी लि. यांच्या संयुक्त विद्यमानाने सर्वेक्षणाचे कामकाज करण्यात आले आहे. यामध्ये, नागरिकांचा सहभाग व पारदर्शक प्रशासन, जी.आय. एस. प्रणालीद्वारे महानगरपालिका क्षेत्रामधील मिळकतीसाठी सुधारीत सेवा, संसाधनांचे सुधारित नियोजन, नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन, आपत्कालीन व्यवस्थापन करण्यास मदत होणार आहे. नागरिकांना भविष्यातील होणारे फायदे लक्षात घेवून जी.आय.एस.प्रणाली राबविण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने जीआयएस सक्षम ईआरपीवर एकात्मिक प्रकल्प म्हणून घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार, जीआयएस, ईआरपी आणि डिजिटल वर्कफ्लो व्यवस्थापन सुरू झाल्यापासून एकात्मिक पद्धतीने विकसित केले जात आहे.

या प्रकल्पांतर्गत, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या (PCMC) १००० हून अधिक प्रक्रियांवर व्यवसाय प्रक्रिया पुनर्रचना करण्यात आली आहे.



"जीआयएस सक्षम एकात्मिक ईआरपी प्रकल्प हा भारतातील पहिला प्रकल्प आहे. ज्या ठिकाणी महानगरपालिकेचे सर्व विभाग भौगोलिक माहिती प्रणालीसोबत 'इंटरप्रायजेस रिसोर्सेस प्लॅनिंग' द्वारे एकत्रित केले जातील. ज्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील विविध भू-स्थानिक माहितीचा सर्वात चांगल्या प्रकारे वापर करू शकेल. तसेच, नागरिकांना कार्यक्षम आणि प्रभावीपणे सेवा प्रदान करण्यास मदत होणार आहे."

– **शेखर सिंह,** आयुक्त- पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

### 15 ऑगस्ट रोजी प्रकल्प होणार कार्यान्वित...

» जीआयएस प्रकल्प १५ ऑगस्टपासून कार्यान्वित करण्यात येणार आहे. यातील २० आयटी ऍप्लिकेशन्स प्रथमता सूरू करण्यात येतील. त्यानंतर टप्प्या – टप्प्यांने महापालिकेच्या सर्व विभागांमध्ये हे मॉड्यूल सूरू करण्यात येणार आहे. मनपाची वेबसाईट आणि स्मार्ट सिटी ऍपला देखील ही सूविधा जोडण्यात येणार असून मनपाच्या सर्व सुविधांची माहिती नागरिकांना उपलब्ध होणार आहे.

# 'प्रधानमंत्री आवास' अर्जासाठी अखेर मुदतवाढ!

### अजित गव्हाणे यांच्या मागणीला यश : आयुक्त शेखर सिंह यांची सकारात्मक भूमिका

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आकुर्डी व पिंपरी येथे योजना राबविण्यात येत असून, सदर प्रकल्पाकरिता अर्ज ऑनलाईन भरुन घेण्यासाठी दि. २८ जुलै २०२३ रोजीपर्यंत जाहीर प्रकटनाद्वारे मुदत देण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने सदर योजनेसाठी आवश्यक



कागदपत्रांपैकी अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला इ. कागदपत्रे मिळणेकामी नागरीकांना लागणारा विलंब लक्षात घेता सदर प्रकल्पांतर्गत नागरिकांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यासाठी दि. १२ ऑगस्ट २०२३ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. सर्वसामान्य नागरिकांना अर्ज सादर करताना द्यावयाच्या कागदपत्रांसाठी अनेक अडचणी येत असल्यामुळे या योजनेंतर्गत अर्ज सादर करण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केली होती. अखेर गव्हाणे यांच्या मागणीला यश आले आहे.

### आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी 938 घरांचा प्रकल्प

» पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आकुर्डी आणि पिंपरी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी 938 घरांचा प्रकल्प राबविला आहे. या योजनेत घर घेण्यासाठी इच्छुक असलेल्या नागरिकांना अर्ज करण्याचे आवाहन महापालिकेने केले होते. ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी 28 जून ते 28 जुलै असा तीस दिवसांचा कालावधी दिला होता. अर्जासाठी विविध प्रकारच्या दहा कागदपत्रांची पुर्तता करण्याचे बंधन अर्जदारास टाकण्यात आले होते. महापालिकेने मागितलेली विविध दहा प्रकारच्या कागदपत्रांमध्ये उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नोंदणीकृत भाडे करारनामा, अधिवास प्रमाणपत्रांसह इतर कागदपत्रांचा समावेश आहे.

# नाझरे धरण कोरडे !

## » नाझरे धरणात फक्त दीड महिना पुरेल एवढंच पाणी शिल्लक

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जेजुरी व परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या कऱ्हा नदीवरील नाझरे धरणात फक्त दीड महिना पुरेल एवढाच पाणी साठा शिल्लक राहिला आहे. पावसाळा सुरू होऊन दोन महिने झाले तरी धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ झालेली नाही, त्यामुळे या परिसरात चिंतेचे वातावरण आहे.**



या धरणाची पाणीसाठाक्षमता ७८८ दशलक्ष घनफूट असून यातील ५८८ दशलक्ष घनफूट साठा उपयुक्त आहे. तर २०० दशलक्ष घनफूट पाणीसाठा मृत मानला जातो. या धरणाचे एकूण पाणलोट क्षेत्र ३९७.८२ चौरस किलोमीटर आहे,सध्या या धरणामध्ये मृत साठ्यापैकी फक्त १५६ दशलक्ष घनफूट पाणी शिल्लक आहे, त्यामध्येही गाळ भरपूर आहे.सासवड, गराडे, सोमर्डी,कोडीत,चांबळी, भिवडी, पुरंदर किल्ला परिसर, नारायणपूर,आदी भागात चांगला पाऊस झाल्यास पाणी कऱ्हा नदीतून नाझरे धरणात येते , परंतु पुरंदर तालुक्यातच पावसाचे प्रमाण कमी असल्याने या धरणात अद्यापि पाणी आलेले नाही. त्यामुळे धरणाचे पात्र कोरडे पडत चालले आहे. गराडे धरण ५० टक्के भरले ते पूर्ण भरल्यानंतर वाटेतील सर्व बंधारे भरत पाणी नाझरे धरणात येणार आहे. नाझरे धरणातून जेजुरी गाव,जेजुरी औद्योगिक वसाहत,इंडियन सिमलेस कंपनी, मोरगाव व १६ गावे, नाझरे व पाच गावे व शेतीसाठी पाणीपुरवठा केला जातो,सुमारे ३१५० हेक्टर शेतीचे क्षेत्र ओलिताखाली आहे. नाझरे धरणात अद्यापही पाणीसाठा न वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये काळजीचे वातावरण आहे. धरणाच्या परिसरात एक जून पासून १३० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे,गेल्या वर्षी हाच पाऊस ९९६ मिलिमीटर होता. जेजुरी हे तीर्थक्षेत्र आहे येथे येणाऱ्या भाविकांना याच धरणातील पाणी पुरविले जाते.पुरंदर तालुक्यात अद्यापही पुरेसा पाऊस नसल्याने बऱ्याचशा पेरण्या रखडल्या होत्या परंतु गेले चार-पाच दिवस रिमझिम पाऊस झाल्याने खरिपाच्या पेरण्या होण्याची शक्यता आहे.

### योजनांना दिवसाआड पाणीपुरवठा

» नाझरे धरणात सध्या गाळमिश्रित पाणी शिल्लक राहिल्याने संभाव्य पाणी टंचाईचे संकट लक्षात घेऊन सर्व पाणीपुरवठा योजनांना सध्या दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. भविष्यात धरणातील पाणीसाठ्यात वाढ होण्याची अपेक्षा आहे. पाणीसाठा न वाढल्यास पंधरा दिवसांनंतर फक्त पिण्यासाठीच काही तास पाणीपुरवठा केला जाणार आहे, अशी माहिती नाझरे सिंचन विभागाचे अधिकारी विश्वास पवार व शाखा अभियंता अनिल घोडके यांनी दिली.

# कुणाल आयकॉन रस्त्याचा विकास

## » माजी नगरसेवक शत्रुघ्न काटेंच्या पाठपुराव्याला यश

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपळे सौदागर येथील कुणाल आयकॉन रस्त्याचे अद्ययावत पध्दतीने विकास करण्याचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या या कामासाठी माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी पाठपुरावा केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करून पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना काटे यांनी दिल्या आहेत. हा रस्ता पूर्ण झाल्यास परिसरातील सोसायटीधारकांना त्याचा फायदा होणार आहे.**



### अपघाताचे प्रमाण थांबणार...

» या रस्त्यावर खोदाई केल्यामुळे त्याचा वाहनधारकांना त्रास होत आहे. अनेकदा किरकोळ अपघात होत असतात. त्या बाबत नागरिकांनी सातत्याने तक्रारी केल्या आहेत. नागरिकांच्या या तक्रारी पाहता त्यावर त्वरित उपाययोजना करण्यासाठी काटे यांनी पुढाकार घेतला. हा रस्ता विकसित झाल्यास अपघाताचे प्रमाण देखील कमी होणार आहे.

या संदर्भात २८ जुलै रोजी नगरसेवक शत्रुघ्न काटे आणि संबंधीत पालिका स्थापत्य प्रकल्प अधिकारी, आर्किटेक्ट व कन्सलटंन्ट यांच्या सोबत बैठक पार पडली. सदर बैठकीत नियोजित आराखड्यावर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीवेळी स्थापत्य प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता संध्या वाघ, उपअभियंता संजय काशीद, इन्फ्रा कंन्सलटंट कंपनीचे सल्लागार लक्ष्मीकांत पतंगे, रणजीत कोल्हे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी या कामाच्या निविदा त्वरित काढाव्यात आणि काम सुरू करावे, अशा सूचनाही संबंधित विभाग प्रमुख आर्किटेक्ट आणि कन्सलटंन्ट यांना दिल्या आहेत. प्रभाग क्रमांक 28 रहाटणी पिंपळे सौदागर येथील कुणाल आयकॉन रस्ता हा विविध खोदकामामुळे खूप खराब झाला. या रस्त्यावर खूप खड्डे पडलेले असून रस्ता खिळखिळीत झाला आहे. या खड्डेमय रस्त्यामुळे वारंवार छोटे मोठे अपघात होत असतात. महापालिकेतर्फे या रस्त्याची वारंवार तात्पुरत्या स्वरुपात डागडुजी केली जाते. परंतु, पुन्हा काही कामासाठी रस्ता खोदला जातो. रस्त्याची परिस्तिथी जैसे थे होते, संपूर्ण पिंपळे सौदागर मधील मुख्य रस्ते हे सिमेंट कॉँक्रीटचे झाले असून हा रस्ता शासकीय निविदेत अडकला आहे.

कुणाल आयकॉन रस्ता खूप रहदारीचा व वर्दळीचा आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात निवासी सोसायट्या, शाळा, व्यावसायिक दुकाने आहेत त्यामुळे हा रस्ता खूप महत्वाचा आहे, पावसाळा काही दिवसांवर आला असून शाळा देखील चालू होणार आहेत. त्यामुळे सदर काम सुरू करण्यापूर्वी भूमिगत असलेल्या स्टोर्म लाईन, पाणीपुरवठा लाईन, एमएसईबी केबल्स याच्याशी निगडीत असलेल्या उपाययोजना करण्याच्या सूचना माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी दिले आहे.

# कर भरण्यासाठी शेवटचे चार दिवस

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

निवासी, बिगरनिवासी, मोकळ्या जागेचा कर भरण्यासाठी चार दिवस बाकी असल्याने अधिकाधिक नागरिकांना कर भरता यावा, यासाठी शनिवार आणि रविवारी (२९ आणि ३० जुलै) महापालिकेची सर्व नागरी सुविधा केंद्र सकाळी दहा ते सायंकाळी पाच या कालावधीत सुरू राहणार आहेत. सोमवारी अखेरच्या दिवशी नागरी सुविधा केंद्र सकाळी दहा ते रात्री दहा या कालावधीत सुरू राहणार असल्याची माहिती महापालिकेच्या मिळकतकर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून देण्यात आली. दरम्यान, ३१ जुलैपर्यंत संपूर्ण मिळकतकर भरणाऱ्यांना सर्वसाधारण करामध्ये किमान पाच ते कमाल दहा टक्क्यांपर्यंतची सवलत मिळणार आहे.

पालिकेला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी २४ टक्के उत्पन्न मिळकतकरातून प्राप्त होते. चालू आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात (२०२३-२४) मिळकतकरातून २ हजार ६०० कोटींचे उत्पन्न मिळेल, असा अंदाज आहे. चाळीस टक्क्यांच्या सवलतीबाबतचा निर्णय होण्यास विलंब झाल्याने मिळकतकराच्या देयकांचे उशिरा वितरण करण्यात आले. १५ मे ते ३१ जुलै या कालावधीत मिळकतकर भरण्याची मुदत देण्यात आली आहे. ही मुदत संपुष्टात येण्यास चार दिवसांचा कालावधी बाकी आहे. त्यामुळे शनिवार आणि रविवार सुट्टीच्या दिवशीही नागरी सुविधा केंद्र सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ऑनलाइन माध्यमातून कर भरणा करण्यात येणार असून, जुलै महिन्यानंतर मिळकतकरधारकांसाठी जाहीर केलेली लॉटरी योजना राबविण्यात येणार आहे. या लॉटरी योजनेअंतर्गत एक कोटी रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत.

# वीज समस्या सुटणार!

## » उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधानसभेत आश्वासन

### » भाजपा आमदार महेश लांडगे यांची विधानसभेत लक्षवेधी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांतील सर्वसामान्य नागरिक आणि औद्योगिक कंपन्यांना भेडसावणारी वीज समस्या सोडवण्यासाठी राज्य सरकारकडून सकारात्मक भूमिका घेतली जाईल. औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवड हे प्रागतिक शहर असून, वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी पायाभूत सुविधा सक्षम करण्यात येतील, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडमधील वीज वितरण व्यवस्था आणि पायाभूत सुविधांबाबत विधीमंडळ सभागृहात लक्षवेधी मांडली.



> राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी-चिंचवडचा वीज प्रश्न सोडवण्याबाबत अत्यंत संवेदनशीलपणे निर्णय घेतला. 'आरडीएसएस'च्या योजनेंतर्गत २२६ कोटी रुपयांचा निधी तात्काळ मंजूर केला. तसेच, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड ॲग्रिकल्चरल संस्थेच्या पुढाकाराने लघु उद्योजकांसाठी सौर ऊर्जेबाबत प्रस्ताव दिला आहे. त्याबाबही सकारात्मक विचार केला जाणार आहे. त्याबद्दल लवकरच धोरण ठरवण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहराचा आगामी ३० वर्षांत वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन दूरदृष्टीने निर्णय होत आहेत. त्याबद्दल उपमुख्यमंत्री फडणवीस आणि राज्य सरकारचे आभार व्यक्त करतो.
>
> – **महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा

त्याला उत्तर देताना उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

सभागृहात बोलताना आमदार लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहरात औद्योगिकरण आणि नागरीकरण मोठ्याप्रमाणात वाढले आहे. त्यामुळे प्रशासन आणि वीज वितरण व्यवस्थेवर ताण येत आहे. सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, गृहिणी, औद्योगिक वसाहतीमधील लघु उद्योजकांना वीज समस्यांचा सामना करावा लागत आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात शहरात पहिल्यांदा वीजवाहिनी भूमिगत करण्याचे काम करण्यासाठी सुरूवात केली. सुमारे सव्वादोनशे कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर केला. मात्र, अद्याप हे काम पूर्ण झाले नाही.

त्यानंतर अनेकदा हा विषय सभागृहात मांडला पण अपेक्षीत कार्यवाही झाली नाही. पिंपरी-चिंचवडसारख्या औद्योगिक शहरात २४-२४ तास वीज पुरवठा खंडीत झाला, तर लोकप्रतिनिधींना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. राज्य सरकारने महावितरण उपविभाग, शाखा कार्यालय, मनुष्यबळ वाढ करण्याची आवश्यकता आहे.

### तीन उच्चदाब उपविभागीय केंद्र उभारणार...

» याला उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पिंपरी-चिंचवड औद्योगिक नगरी आहे. विशेष म्हणजे, पुणे, पिंपरी-चिंचवड अशी शहरं ही महाराष्ट्रातील प्रागतिक असून, 'फ्युचर सिटी' म्हणून या शहराकडे पाहिले जाते. त्यामुळे या शहरातील वीज वितरण यंत्रणा सक्षम करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी भोसरी उपविभागाचे दोन विभाजन करण्यात येईल. लोकसंख्या वाढल्यामुळे चिखली शाखा, आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येईल. मेट्रोच्या कामामुळे एलटी आणि एचटी वाहिन्या तुटल्यामुळे वीजपुरखठा खंडीत होण्याची समस्या ३९ वेळा निर्माण झाली. आता हे काम पूर्ण झाल्यामुळे यापुढील काळात तक्रारी येणार नाही. सफारी पार्क मोशी येथे अतिउच्चदाब केंद्र, चऱ्होली येथे प्राईड वर्ल्ड सीटी येथे अतिउच्चदाब केंद्र, सेन्चुरी एनका येथे पॉवर ट्रान्स्फॉर्मर प्रस्तावित केले आहे. त्यासाठी महानगर प्रदेश प्रणाली मजबुतीकरण योजना, महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ योजनासह जिल्हा वार्षिक योजना या सर्व योजनांद्वारे वीज वितरण विषयक कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल. 'आरडीएसएस'च्या योजनेंतर्गत २२६ कोटी रुपयांची कामे केली जाणार आहेत. त्यासाठी निविदा प्रक्रिया लवकरच राबवली जाईल. त्याद्वारे वीज समस्या सोडवण्याला प्राधान्य देण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.

# रस्त्याच्या कामासाठी नाना काटे 'ऑनफिल्ड'

## » महानगरपालिका अधिकाऱ्यांसमवेत घेतली तातडीची बैठक

### » दोन टप्प्यांत काम पूर्ण करण्याची प्रशासनाची तयारी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपळे सौदागर येथील कुणाल आयकॅान रोडवरील शिवार चौक ते छत्रपती युवा चौकपर्यंत रस्त्याचा अद्ययावत पध्दतीने विकास करण्यात येणार आहे. त्याचे काम लवकरच चालू करण्यात येणार असल्याने त्याबाबत संबंधित स्थापत्य प्रकल्प अधिकारी व सल्लागार कंपनी यांच्या सोबत एक बैठक घेण्यात आली.**

या कामामध्येपूर्वी असलेल्या संपुर्ण ड्रेनेज लाईन, स्ट्रॉम वॉटर लाईन नवीन टाकण्यात येणार आहे. या कामासाठी १ ते १.५ वर्षांचा कालावधी लागणार आहे. या रस्त्यावर वाहनाची व नागरिकांची वर्दळ जास्त असल्याने या रस्त्याचे काम दोन टप्यात करण्यात येणार असून, नागरिकांना याचा त्रास होऊ नये, म्हणून वाहतुकीसाठी नवीन तात्पुरते स्वरूपात पर्यायदेखील उपलब्ध करून देण्यात येतील. यासाठी नाना काटे यांनी महापालिका अधिकाऱ्यांसमवेत तातडीची बैठक आयोजित केली.



### कामाला सुरुवात करा...


» या कामासंदर्भात नागरिकांच्या खूप तक्रारी येत असून, लवकरात लवकर या कामाची निविदा काढून काम पूर्ण करावे, अशा सूचना काटे यांनी अधिकाऱ्यांना यावेळी केल्या. या बैठकी दरम्यान संबंधित रस्त्याचे स्थापत्य प्रकल्प विभागाचे अधिकारी कार्यकारी अभियंता श्रीमती संध्या वाघ, उपअभियंता संजय काशीद, इन्फ्रा कंन्सलटंट कंपनीचे सल्लागार लक्ष्मीकांत पतंगे, रणजीत कोल्हे, व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.




# होळकरांकडे होती मोहर्रमची परंपरा

**उद्या मोहर्रमचा दहावा दिवस. त्याआधीची रात्र ही कतल की रात म्हणून ओळखली जाते. भारतात अनेक ठिकाणी मोहर्रम होतो. ताजिये, पंजे बसतात, मिरवणुका निघतात. यात हिंदूंचाही मोठा सहभाग असतो. प्रत्येक शहराची मोहर्रमची स्वतःची वेगळी ओळख आहे. यातून भारतीय संस्कृती आणि मोहर्रम यांचं विशेष नातं तयार झालंय. राज्यातही हिंदू-मुस्लिम ऐक्याचं दर्शन घडवत शाही मोहर्रम व्हायचा.**

दक्षिणेत हैदराबाद आणि उत्तरेत लखनऊ या ठिकाणी मोहर्रमची ऐतिहासिक परंपरा आहे. या दोन्ही ठिकाणी मोहर्रमचे स्वरूप शाही होते. येथील वेगवेगळ्या शाही परंपरा आजही पाळल्या जातात. या दोन शहरांव्यतिरिक्त होळकर घराण्याच्या इंदूरमधे शाही मोहर्रमची परंपरा होती. याविषयीची बरीच माहिती इतिहासाच्या साधनांमधे आढळते. २००६ मधे 'भारतातील मोहर्रम' या विषयावर एका इतिहास परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. इंदूरच्या इतिहासाचे अभ्यासक डॉ. जे. सी उपाध्याय यांनी या परिषदेत इंदौरच्या मोहर्रमवर एक शोधनिबंध सादर केला होता. त्यामधे इंदूरमधील मोहर्रमच्या अनेक अज्ञात पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला होता. इंदूरमधे काही शतकांपूर्वी होळकर राज्यकर्त्यांचे अनेक मजली, उंच-उंच चौकोन ताजिये संपूर्ण राज्यात लोकप्रिय



होते. मोहर्रमच्या महिन्यात त्यांची मिरवणूक निघायची. ताजिये बनवण्यासाठी त्या काळी तीन हजार रुपये खर्च व्हायचे. नंतरच्या काळात त्यांची उंची कमी होत गेली. सुरुवातीला अकरा, नंतर नऊ आणि शेवटी सात मजली ताजिये बनवले जाऊ लागले.

आताच्या काळात हे ताजिये फक्त एक मजली असतात. ताजीयांची उंची घटली असली तरी, त्याविषयीची श्रध्दा मात्र कमी झालेली नाही. आजही आहिल्यादेवी ट्रस्ट या खासगी संस्थेच्या वतीने ताजिया बनवण्यासाठी चागंली वर्गणीही देण्यात येते.

होळकर घराणे धर्मादायी कार्यासाठी भारतात ओळखले जाते. अहिल्याबाई होळकर यांनी अनेक ठिकाणी धर्मशाळा, मंदिरे, बारव वगैरे बांधल्या आहेत. त्याच पध्दतीने त्यांनी होळकर राजघराण्याचे मोहर्रमचे इमामवाडेही बांधले. इमामवाडा म्हणजे शिया मुस्लीम एकत्र जमून 'मजलिस' किंवा सभा घेतात, नामस्मरण करतात ती जागा. होळकर सरकारच्या वतीने १९०८ मधे गोपाळ मंदीराजवळ १२ हजार रुपये खर्च करुन बांधण्यात आलेला इमामबाडा आजही दिमाखात उभा आहे. होळकर राज्यकर्त्यांच्या वतीने मोहर्रमच्या तयारीसाठी सर्व प्रशासकीय कार्यालयांना विशेष आदेश जारी केले जात असत. कुठे कोणती व्यवस्था कधी करायची यांविषयी या आदेशात सविस्तर सूचना केली जायची. सरकारी भविष्यवेत्ते पंचांग पाहून शुभ महुर्त काढायचे. त्यानंतर सर्व सरकारी विभागांना मोहर्रमच्या चंद्ररात्रीपासून १३ व्या रात्रीपर्यंतचे सर्वप्रकारच्या विधींविषयी आदेश दिले जात होते. शहर काझीला इमाम बाड्यात बोलावून चौकी वगैरे धुण्याची जबाबदारी सोपवली जायची. सरकारचे आधिकारी, मंत्री, इन्स्पेक्टर जनरल पोलीस आणि जिल्हा न्यायाधिशांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सोपवल्या जात होत्या. याविषयी अनेक फर्मान आजही आर्काईव्हजमधे उपलब्ध आहेत. मोहर्रममधे फकिरांना विशेष महत्व असे. काही फकीर राजवाड्यात येत. त्यांना ताजिया बनवण्यासाठी बांबू, सुत, उदबत्या, हार, फुल, नैवेद्य, दिवा प्रज्वलित करण्यासाठी त्याकाळी चार आणे दिले जायचे. विशेष रात्री सैन्याचे बँड देखील वाजवले जायचे. रात्री आठ वाजल्यापासून अकरा वाजेपर्यंत कार्यक्रम आयोजित केले जात होते. मोहर्रमचे चंद्रदर्शन व्हायचे त्याला 'चांदरात' (चांद्ररात्र) म्हटले जाते. मोहर्रमचा पहिला दिवस या चांद्ररात्रीच्या दुसऱ्या दिवशी सुरु होत असे. चांद्ररात्री चंद्रदर्शन झाल्यानंतर शहर काझी आणि ताबूतचे फकीर एका लाकडाची चौकी सजवून त्यावर उदाचे तबक ठेवत. ते तबक शाही सेवकाच्या डोक्यावर ठेऊन इमामबाड्यापासून राजवाड्याजवळ नजरबागेजवळ आणले जात असे.

नजरबागेत हे तबक ठेऊन फकीर दुरुद पठण करायचे. प्रसाद म्हणून बत्ताशे वाटले जायचे. त्यानंतर हे तबक इमामबाड्यात आणून ताजियाच्या समोर ठेवले जात असे. चांदरात्रीपासून कत्तलच्या (इमाम हुसैन यांच्या हौतात्म्याच्या) रात्रीपर्यंत इमाम बाड्यावर शोकसंगीत वाजवले जायचे. ताबूतच्या सुरक्षेसाठी एक सैनिक लष्कराच्या वतीने आणि एक विशेष बंदुकधारी शिपाई असे दोन शिपाई इमामबाड्यासमोर पहाऱ्यावर तैनात केले जायचे.

## संपादकीय »

# विवस्त्र विश्वास!

***पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या विरोधात मांडण्यात आलेल्या अविश्वास ठरावाचे भवितव्य काय हे शालेय अंकगणितीही सांगू शकेल...***

पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या विरोधात मांडण्यात आलेल्या अविश्वास ठरावाचे भवितव्य काय हे शालेय अंकगणितीही सांगू शकेल. म्हणजे तो मंजूर होण्याची सुतराम शक्यता नाही. तेव्हा तो ठराव पराभूत झाल्यावर उगाच विजयाचा आनंद मिरवण्याची गरज नाही आणि विरोधकांस कसे चीतपट केले याची प्रौढी मिरवण्याचीही आवश्यकता नाही. या ठरावाच्या मुद्दय़ावर विरोधक चीतपट होणारच आहेत. कारण त्यांच्याकडे बहुमत नाही. ते असते तर ते 'विरोधक' राहिले नसते. तेव्हा अविश्वास ठरावाचे भवितव्य काय, हा चर्चेचा विषय असू शकत नाही. तसे पाहू गेल्यास भारतीय सांसदीय इतिहासात सरकारविरोधात अविश्वास ठराव मंजूर झाल्याची उदाहरणे केवळ तीन आणि त्या तिन्ही वेळी सत्ताधारी आघाडय़ांत बेबनाव होता. सद्य:स्थितीत तर असा ठराव मंजूर होणे नाही, हे सर्वच जाणतात. तरीही असे ठराव मांडले जातात.

**हवामान बदलामुळे जागतिक, प्रादेशिक आणि स्थानिक पातळीवर कृषी, अन्नपुरवठा व अन्नसुरक्षा यावर अलीकडील काळात विपरित परिणाम दिसून येत आहेत. तापमानात होणारी वाढ, मान्सूनच्या आगमनात झालेले बदल, अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळ या सर्व गोष्टींचा परिणाम शेती आणि पीक उत्पादकतेवर प्रकर्षाने जाणवत आहे.**

# हवामान बदलाचे बळी?

वातावरणातील बदलाचे ताजे उदाहरण म्हणजे सध्या टोमॅटोच्या दरात झालेली वाढ. टोमॅटोचे दर सद्यस्थितीत १०० ते १५० रुपये किलोपर्यंत पोहोचले आहेत आणि या दरवाढीमागे काही प्रमाणात वातावरणीय बदलही कारणीभूत आहेत. देशातील तापमानवाढ व मान्सून वेळेवर न येण्यामुळे या पिकाला मोठा फटका बसला आहे. महाराष्ट्र व कर्नाटकमधील शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार टोमॅटोमधील लिफ कर्ल व्हायरस या रोगामुळे टोमॅटो उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे, एकंदरीत टोमॅटो पिकाला दुहेरी फटका बसल्यामुळे दरवाढीचा भडका उडाला आहे. २०२२ च्या एप्रिल महिन्यात झालेल्या गारपिटीने द्राक्ष बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले त्याबरोबर इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मागील काही दिवसांमध्ये कृषी मंत्रालयाकडून आलेल्या माहितीनुसार गहू उत्पादनामध्ये ३ टक्क्यांची घट



झाली आहे. ही घट २०१४ – १५ नंतरची पहिली घट आहे व या उत्पादनातील घटीसाठी उष्ण हवामान जबाबदार असल्याचे कृषी मंत्रालयाकडून सांगण्यात आले आहे. या वर्षीच्या उन्हाळ्यात विदर्भाचा कॅलिफोर्निया म्हणून ओळखला जाणारा वरुड व मोर्शी हा संत्रा उत्पादक भाग अचानक झालेल्या तापमान वाढीमुळे संकटात सापडला. या भागातील तापमान हे ४५ अंशांच्यावर पोहोचल्यामुळे शेतकऱ्यांनी धरलेल्या अंबिया बहराची फळे मोठ्या प्रमाणात गळाली. त्यामुळे या भागातील संत्रा उत्पादक शेतकरी मोठ्या चिंतेत आहे. तर दुसरीकडे अकोला जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांचे वाढत्या तापमानामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वाढत्या तापमानामुळे केळीच्या वजनात ५ ते ६ किलो प्रती घड घट आली आहे. शिवाय वादळी वारे आणि गारपिटीनेही केळी बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वातावरणीय बदलाचा फटका केवळ भारतातच नाही तर विदेशातही बसत आहे. फ्रान्समधील स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत कारण हंगामातील सरासरी अधिक तापमान वाढीमुळे वेळेआधी स्ट्रॉबेरी पिकत आहे व त्यामुळे उत्पादनात लक्षणीय घट येते आहे. ऑगस्ट २०२२ मध्ये मुसळधार पावसाने पाकिस्तानमधील कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. गेल्या वर्षी पाकिस्तान कॉटन जिनर्स असोसिएशनने सांगितले की २०२३ च्या आर्थिक वर्षात उत्पादनातील आर्थिक तफावत भरून काढण्यासाठी देशाला ३.१ दशलक्ष गाठी कापूस आयात करावा लागेल त्याची किंमत १.२ अब्ज डॉलरपेक्षा जास्त आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आम्हां आम्ही आतां वडील धाकुटीं ।
नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजें ॥१॥

फावला एकांत एकविध भाव ।
हरि आम्हांसवें सर्व भोगी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आपण क्षुद्र किंवा नालायक!

## सुषमा अंधारे यांची अभिनेते शरद पोंक्षेंवर बोचरी टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शरद पोंक्षे हे मराठीतील प्रसिद्ध आणि ज्येष्ठ अभिनेते आहेत. तसंच, ते सोशल मीडियावर बरेच सक्रिय असतात. बऱ्याच मुद्द्यांवर ते थेट प्रतिक्रिया देत असतात. त्यामुळे अनेकदा ते वादाच्या भोवऱ्यात सापडतात. आताही मुलीचं कौतुक करताना त्यांनी केलेला आरक्षणाचा उल्लेखावरून त्यांच्यावर चौफेर टीका होत आहे.**

मराठी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते शरद पोंक्षे यांची कन्या पायलट होऊन परदेशी नोकरीसाठी गेली आहे. तिची करिअरमधील ही उंच भरारी शरद पोंक्षे यांनी सोशल मीडियाद्वारे सर्वांना कौतुकाने सांगितली. तिचं कौतुक करताना पोंक्षे यांनी आरक्षणाचा उल्लेख केला होता. त्यामुळे त्यांच्या मुलीवर कौतुकाचा वर्षाव होत असतानाच शरद पोंक्षे यांच्यावर टीका होत आहे. सर्वच स्तरातून त्यांच्यावर टीका होत असताना आता राजकीय वर्तुळातूनही प्रतिक्रिया उमटत आहेत. आता ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनीही शरद पोंक्षे यांच्यावर टीकास्त्र सोडलं आहे. "कु सिध्दी शरद पोंक्षे आज पायलट झाली. इयत्ता चौथीपासून तिने पाहीलेलं स्वप्न पूर्ण झालं. अत्यंत खडतर परीस्थितीतून,माझं आजारपण,कोरोना, लॉकडाऊन, आर्थिक स्थिती बिकट हे सगळे अडथळे पार करत. कोणतीही सवलत,आरक्षण नसताना केवळ मेहनत, बुध्दीमत्ता, परिश्रम व निष्ठा ह्या जोरावर ती पायलट झाली. बापाला आणखी काय हव नाही का? आज अभिमान अभिमान फक्त अभिमान वाटतोय तुझा सिध्दी. मोठी हो पुढे देशाची सेवा कर. उत्तम सेवा दे. करशिलच खात्रीच आहे. लव यू बाळा", असे शरद पोंक्षेंनी म्हटले होते. मुलीची गगनभरारी कोणत्याही पित्यासाठी आनंदाचा क्षण असतो. तो आनंदाचा क्षण लोकांसोबत साजरा करताना शरद पोंक्षे यांनी ही वरील पोस्ट लिहिली होती. त्यात त्यांनी आरक्षणाचा मुद्दा मांडला होता. त्यांचा हाच मुद्दा आता चर्चा आणि वादाचा विषय ठरला आहे. यावरूनच सुषमा अंधारे यांनी टीका केली आहे. "शरद राव (पोंक्षे ) नमस्कार, एरवी मला दादा-भाऊ असं बोलून सुरुवात करायची सवय आहे. मात्र निश्चितपणे तुम्हाला ते आवडणार नाही. कारण तुमची माझी ना जात एक आहे. ना गोत्र एक आहे. कारण माणसां-माणसात भेद निर्माण करणारा जो सनातनी धर्म तुम्ही सांगत आहात तो कदाचित मला मान्य होणार नाही आणि प्रबोधनकारांनी किंवा शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब यांनी किंवा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब सांगत असलेले सर्व समावेशक हिंदुत्व तुम्हाला कळणार नाही", असं सुषमा अंधारे म्हणाल्या."तुमच्या लेकीचं मनःपूर्वक अभिनंदन. लेक कुणाचीही असो तिचं कौतुक झालंच पाहिजे. पण शरदराव कौतुक करतानासुध्दा माणूस म्हणून कसे आपण क्षुद्र किंवा नालायक आहोत हे दाखवायलाच हवे का?", असा संतप्त सवाल सुषमा अंधारे यांनी विचारला. "शरदराव, भेकड आणि भित्र्या माणसाची अहिंसा ही अहिंसा मानली जात नाही. हे माहीत असेलच तुम्हाला. उलट ज्याच्यामध्ये कमालीचं बाहुबल आहे, भल्या-भल्यांना सहज धूळ चारण्याची धमक आहे पण तरीही जो आपल्या बलाचा प्रयोग निष्कारण करत नाही तो खऱ्या अर्थाने अहिंसा मानणारा. हे इथे लिहिण्याचे कारण म्हणजे आज माझ्या राजकीय कारकीर्दीला अर्थात मी शिवसेनेत प्रवेश केला या घटनेला एक वर्ष पूर्ण होत आहे. मला कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नाही. ना कुठलं जातीय किंवा आर्थिक पाठबळ आहे. पण कुठल्याही जातीय आर्थिक आरक्षणाशिवाय माझ्या गुणवत्तेने मी काय करू शकते हे एक वर्षात तुमच्यासह महाराष्ट्राने बघितलंच आहे", असंही अंधारे म्हणाल्या. "अर्थात् कुठलेही जातीय आर्थिक किंवा वांशिक निकष न लावता निव्वळ माझ्यातल्या गुणवत्तेची पारख करत मला राज्यभर काम करण्याची संधी देणारे सन्माननीय पक्षप्रमुख उद्धव साहेबांचा मानवतावादी दृष्टिकोनही तितकाच महत्त्वाचा आहे.



### वैद्यकीय कर्मचारी कोणत्या जातीचे होते?

» शरद राव तुम्ही एका दुर्धर आजारातून बरे झालात. पण या आजारा दरम्यान उपचार घेत असताना रक्त लघवी तपासण्याचे ठिकाण असेल, मेडिकल स्टोअरवर काम करणारी मुलं असतील, शस्त्रक्रिया दरम्यान आवश्यकता असणारे भुलतज्ञ , केमोथेरपी देणारे डॉक्टर्स, रक्ताची गरजच पडली असेल तर रक्तपेढीत काम करणारे कर्मचारी किंवा दिवस रात्र सेवा करणाऱ्या नर्सेस यांच्या जाती तुम्हाला माहीत होत्या का हो... असो बोलण्यासारखे बरेच आहे.. पण तूर्तास एवढेच..! लवकर बरे व्हा..!! ता. क. जातविषयक पित्त वारंवार उफाळून येत असेल तर बुद्ध गुरुनानक महावीर कबीर संत ज्ञानेश्वर तुकोबाराय यांच्या विचारांचा काढा नियमित घेत चला खात्रीने पित्त असे उफाळून येणार नाही", असं सुषमा अंधारे म्हणाल्या.

---

# भिडेसारख्या विकृतीवर कारवाई करा!

## बाळासाहेब थोरात यांची सभागृहात मागणी

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**संभाजी भिडे नावाचा इसम राष्ट्रपित्यावर टीकाटिप्पणी करतो, संपूर्ण देशासाठी लाजिरवाणी गोष्ट आहे सरकारने त्याचा आजच बंदोबस्त करावा आणि त्या संदर्भात सभागृहात निवेदन करावे, मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी केली.**

दरम्यान बाळासाहेब थोरात पुढे म्हणाले की, संभाजी भिडे ही विकृती आहे. त्यांनी देशाचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या संदर्भात अत्यंत अवमानकारक विधान केले आहे. जे समग्र देशासाठी अत्यंत अस्वस्थ करणारे आहे.

संभाजी भिडे वारंवार असे बोलतो, त्याला पाठीशी नेमका कोण घालतो याचा शोध घेणे आवश्यक आहे.

संभाजी भिडे यांचा हेतू महाराष्ट्राचे वातावरण अस्थिर करण्याचा आहे हे ओळखले पाहिजे. बाळासाहेब थोरात पुढे म्हणाले की, कोणाच्या राजकीय फायद्यासाठी तो वारंवार अशी विधाने करतो? आम्ही सभागृहात संभाजी भिडेवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. सरकारने आजच या विषयावर कारवाई करावी आणि सभागृहाला सूचित करावे.

अन्यथा आम्ही शांत बसणार नाही. थोरात म्हणाले, पुरोगामी विचार संपवण्यासाठी एक यंत्रणा काम करते, असे आमचे स्पष्ट मत आहे. हा सततचा खोडसाळपणा सरकारने सहन करू नये.



### सरकार गंभीर दिसत नाही

» बाळासाहेब थोरात पुढे म्हणाले की, कालही आम्ही क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्यासंदर्भात बदनामीकारक लिखाण करणाऱ्यावर कारवाईची मागणी केली होती. थोरात यांनी सरकारवर आरोप करताना सांगितले, एकूणच या संपूर्ण प्रकरणात सरकार गंभीर दिसत नाही. भिडे सारख्या विकृतीवर वेळीच कारवाई केली तर सरकारचा हेतू शुद्ध आहे असे म्हटले जाईल.

---

# सरकार क्लिनचीट देणारा कारखाना

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

शिवसेना खासदार संजय राऊत सातत्याने ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करत होते, त्या भाजप आमदार राहुल कुल यांना राज्य सरकारने दिली क्लिन चीट दिली आहे. दरम्यान यावरुन ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत म्हणाले की, सरकार म्हणजे क्लिनचीट देणारा कारखाना आहे. तर यावेळी माध्यमांशी बोलताना भाजप आणि राष्ट्रवादीतील इतर नेत्यांवरही राऊतांनी निशाणा साधला आहे.

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत म्हणाले की, दौंड न्यायालयाने तक्रारदार नामदेव ताकवणे यांच्या तक्रारीला महत्त्व देऊन कारखान्याचे चेअरमन, लेखापरिक्षक यांच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यात काही तथ्य असल्याशिवाय न्यायालय आदेश देणार नाहीत. या कारखान्यातील त्रुटी, घोटाळ्यांची सविस्तर माहिती गृहमंत्र्यांना मी दिली आहे.

सीबीआय आणि ईडीलाही माहिती पाठवली आहे. तरीही चौकशीशिवाय सरकार क्लिनचीट देत असेल तर कोणीही घोटाळा करावा आणि वॉशिंग मशिनमध्ये जावे, घुसळून काढावे आणि बाहेर यावे असे झाले आहे. भ्रष्टाचार करणारा त्यांच्या पक्षाचा माणूस आहे, त्यामुळे आपण त्याला वाचवलं पाहिजे, ही गृहमंत्र्यांची भूमिका आहे.

# इंडियाचे 20 नेते मणिपूरला

## »मणिपूरमधील हिंसाचाराच्या विरोधात हल्लाबोल

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मणिपूरमधील हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर विरोधक केंद्र सरकारवर सातत्याने हल्लाबोल करत आहेत. आता I.N.D.I.A.कडून मणिपूरला जाणाऱ्या 20 नेत्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. हे सर्व नेते उद्या आणि परवा मणिपूरमध्ये असतील.**




I.N.D.I.A.च्या मणिपूरमध्ये जाणाऱ्या नेत्यांत काँग्रेसचे खासदार अधीर रंजन चौधरी आणि गौरव गोगोई, जेडीयूचे राजीव रंजन सिंग, टीएमसीच्या सुष्मिता देव, डीएमकेच्या कनिमोझी, करुणानिधी, सीपीआयचे संतोष कुमार, सीपीआयएमचे एए रहीम, आरजेडीचे मनोज झा, सपाचे जावेद अली खान, माही अली खान यांचा समावेश आहे.

या नेत्यांशिवाय, विरोधी यादीत राष्ट्रवादीचे पीपी मोहम्मद फैजल, जेडीयूचे अनिल प्रसाद हेगडे, आययूएमएलचे ईटी मोहम्मद बसीर, आरएसपीचे एनके प्रेमचंद्रन, आपचे सुशील गुप्ता, शिवसेनेचे यूबीटीचे अरविंद सावंत, डी रविकुमार आणि व्हीचे थॉल थिरुमावलावन यांचा समावेश आहे.

आरएलडीचे जयंत सिंह आणि काँग्रेसच्या फुलो देवी नेताम यांच्या नावांचाही समावेश आहे. तत्पूर्वी, काँग्रेस खासदार नसीर हुसेन यांनी प्रसारमाध्यमांना माहिती दिली की उद्या इंडिया आघाडीचे एक शिष्टमंडळ मणिपूरच्या डोंगरी आणि खोऱ्यातील हिंसाचारग्रस्त लोकांसाठी उभारण्यात आलेल्या मदत शिबिरांना भेट देणार आहे. आम्ही त्यांना संदेश देऊ इच्छितो की आम्ही त्यांच्या पाठीशी उभे आहोत आणि देशात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्व काही करू.

परवा यातील10 खासदारही राज्यपालांची भेट घेणार आहेत. मणिपूरमध्ये सुरू असलेल्या हिंसाचाराच्या विरोधात भारतीय वंशाच्या लोकांनी गुरुवारी यूकेची राजधानी लंडनमध्ये मूक मोर्चा काढला. द वुमन ऑफ नॉर्थ ईस्ट इंडिया सपोर्ट नेटवर्कशी संबंधित पुरुष आणि महिलांनी लंडनमधील भारतीय उच्चायुक्तालयासमोर मूक आंदोलन केले. चेहऱ्यावर मास्क घातलेल्या आंदोलकांनी हातात फलकही घेतले होते.

### कुकी-जो महिला मंचाने निदर्शने

» मणिपूरमधील हिंसाचाराच्या निषेधार्थ कुकी-जो महिला मंचाने शुक्रवारी देशाची राजधानी नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे निदर्शने केली आणि मणिपूरच्या डोंगराळ जिल्ह्यांमध्ये राहणाऱ्या आदिवासी लोकांसाठी स्वतंत्र प्रशासनाची मागणी केली. आंदोलकांनी खास टी-शर्ट परिधान केले होते ज्यावर लिहिले होते, "वेगळे प्रशासन हाच एकमेव उपाय आहे.

# राज्यपालांना सोडून विमानाचे उड्डाण

## »एअर एशियाचे विमान: प्रोटोकॉल उल्लंघनाची तक्रार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**एअर एशियाचे विमान कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत यांच्याशिवाय रवाना झाले. ही घटना 27 जुलैची आहे. विमान सुटण्यापूर्वीच राज्यपाल केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचले होते. गव्हर्नर हाऊसच्या अधिकाऱ्याने ही घटना प्रोटोकॉलचे उल्लंघन असल्याचे म्हटले आणि भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडे तक्रार केली.**





राज्यपाल कार्यालयाने सांगितले की थावरचंद गहलोत टेकऑफच्या 15 मिनिटे आधी पोहोचले होते, तरीही त्यांना विमानात बसण्याची परवानगी देण्यात आली नाही. सूत्रांच्या हवाल्याने द इंडियन एक्सप्रेसने लिहिले की, राज्यपालांना खूप पेच सहन करावा लागला.

गेहलोत दुपारी 2.05 वाजता बेंगळुरूहून हैदराबादसाठी एअर एशिया फ्लाइट I5-972 मध्ये बसणार होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गहलोत पहाटे 1.50 वाजता विमानतळाच्या व्हीआयपी लाउंजमध्ये पोहोचले आणि तेथे काही वेळ घालवला. काही प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे की, विमान कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी राज्यपालांना विमानात प्रवेश दिला नाही. कर्मचाऱ्यांनी विमानाचे दरवाजे बंद असल्याचे सांगितले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यपाल थावरचंद गहलोत यांना उशीर झालेला नाही.

ते पोहोचले तेव्हा 5 मिनिटे बाकी होती. एअर ट्रॅफिक कंट्रोल (एटीसी) आणि फ्लाइट अटेंडंट राज्यपालांना प्रवेशाची परवानगी देऊ शकतात. हा प्रोटोकॉलचा भंग आहे. कायदेशीर कारवाईसाठी पत्रही लिहिले आहे.

वेळेवर पोहोचूनही राज्यपालांना विमानात बसू न देण्याची ही पहिलीच वेळ आहे. राज्यपाल थावरचंद गेहलोत हे हैदराबादमार्गे रायचूरला जाणार होते. 2.05 वाजताचे फ्लाइट चुकल्यानंतर 90 मिनिटांनी म्हणजे दीड तासानंतर त्यांनी हैदराबादला जाणारे पुढचे फ्लाइट घेतले. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, राष्ट्रपती, पंतप्रधान, गृहमंत्री, मुख्यमंत्री आणि सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यासारख्या व्हीव्हीआयपींना सेरेमोनियल लाउंजमध्ये विशेष प्रवेश असतो. राज्यपालांच्या बाबतीत, कोणत्याही प्रकारच्या तपासणी प्रोटोकॉल आवश्यक नाही.


गव्हर्नर यांना सेरेमोनिअल लाउंजमधून थेट विमानात कॅरेजमध्ये नेले जाऊ शकते. फ्लाइट टेक ऑफ होण्याच्या अर्धा तास आधी बोर्डिंग बंद असते. इतर प्रवासी चढल्यानंतर राज्यपालांच्या प्रोटोकॉल टीमला अलर्ट केले जाते. गव्हर्नर हे विमानात चढणारे शेवटचे प्रवासी असतात.

उशीर झाला तरी राज्यपालांना प्रश्न विचारला जात नाही. दिल्लीहून मुंबईला जाणाऱ्या एका प्राध्यापकावर फ्लाइटमध्ये एका महिला प्रवाशाचा विनयभंग केल्याचा आरोप करण्यात आला आहे. 26 जुलै रोजी घडलेल्या या घटनेतील पीडित महिला 24 वर्षीय डॉक्टर आहे. त्यांनी तक्रारीत आरोप केला आहे की, 'प्राध्यापक त्यांच्या शेजारच्या सीटवर बसले होते.

### सर्वेक्षण कसे होणार?

सिडनीहून दिल्लीला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात प्राणघातक हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. एका प्रवाशाने एअर इंडियाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला थप्पड मारली.इतकेच नाही तर प्रवाशाने अधिकाऱ्याची मान मुरडली आणि शिवीगाळही केली.

# धनुषला व्हायचं शेफ




अभिनेता धनुष आज 40 वर्षांचा झाला आहे. शेफ बनण्याचे स्वप्न पाहणारा धनुष आपल्या भावाच्या सांगण्यावरून चित्रपटात आला आणि प्रसिद्ध झाला. इंडस्ट्रीतील सुपरस्टार रजनीकांत यांची मुलगी ऐश्वर्या जेव्हा त्याच्या प्रेमात पडली तेव्हा धनुष साऊथ सिनेसृष्टीत छाप पाडत होता. आयुष्य बदलत राहिले आणि यश येत राहिले. वर्षभरापूर्वी, धनुष आपला मुलगा असल्याचा दावा करणारे जोडपे समोर आले होते. याच्या काही काळापूर्वी धनुषचे काही खासगी फोटोही लीक झाले होते, ज्यामुळे त्याची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. याबाबत त्याला विचारणा केली असता त्याने एका टीव्ही चॅनलसाठी मुलाखत घेणाऱ्या तरुणीला खडसावले आणि लगेचच माईक काढून बाहेर निघून गेला.या व्यतिरिक्त धनुषने फोर्ब्सच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या स्टार्सच्या यादीत 6 वेळा स्थान मिळवले आहे. धनुषचे यूट्यूबवर अनेक रेकॉर्ड आहेत. धनुषचा जन्म 28 जुलै 1983 रोजी मद्रास येथे तामिळ चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माती कस्तुरी राजा यांच्या घरी झाला. त्यांचे नाव व्यंकटेश प्रभू कस्तुरी राजा होते. धनुषला नेहमीच शेफ बनायचे होते, त्यासाठी हॉटेल मॅनेजमेंट स्कूलमध्ये जाण्याचे त्याचे स्वप्न होते. धनुषच्या वडिलांच्या वाटेवर त्याचा मोठा भाऊही दिग्दर्शक झाला, त्यामुळे धनुषने शेफऐवजी अभिनेता व्हावे अशी त्यांची इच्छा होती. धनुषने मोठ्या भावाची आज्ञा मानून प्रवेश घेतला नाही. धनुषने वयाच्या 19 व्या वर्षी त्याच्या वडिलांनी दिग्दर्शित केलेल्या थुल्लुवधो इल्लामई (2002) या तमिळ चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले आणि त्याचे नाव व्यंकटेश बदलून धनुष ठेवले. धनुषने 1996 च्या कुरुथीपुनल चित्रपटात दाखविलेल्या ऑपरेशन धनुषपासून प्रेरणा घेऊन त्याचे स्क्रीन नाव ठेवले. धनुषचा पहिला चित्रपट 'थुल्लूवधो इल्लमाई' बॉक्स ऑफिसवर कमाल दाखवू शकला नाही. या चित्रपटानंतर धनुषला ना कोणतीच ओळख मिळाली, ना त्याला इतर कोणत्याही चित्रपटाची ऑफर आली. अशा परिस्थितीत त्याचा मोठा भाऊ सेल्वाराघवन याने धनुषला त्याच्या दिग्दर्शकीय पदार्पण चित्रपट 'कढाल कोंडें' (2003) मध्ये कास्ट केले. धनुष एक दिवस कढाल कोंडेंसाठी शूटिंग करत होता. सेटवर काही लोक शूटिंग पाहण्यासाठी आले होते. धनुषला पाहताच त्यांनी जवळ येऊन विचारले की चित्रपटाचा नायक कोण आहे. त्यावेळी धनुषला स्वतःला हिरो म्हणवण्याचा आत्मविश्वास नव्हता. लोक त्याची चेष्टा करतील हे त्याला माहीत होते, म्हणून त्याने दुसऱ्या कास्ट सदस्याकडे बोट दाखवले. ते लोक हिरोला शोधू लागले तेव्हा कोणीतरी धनुषकडे बोट दाखवले. हे जाणून ते लोक जोरजोरात हसू लागले. धनुषकडे बोट दाखवत ते लोक म्हणाले, त्या ऑटोचालकाकडे बघ, तो हिरो आहे. ते लोक खूप मस्करी करत होते. हे पाहून धनुष गाडीतून पळून गेला आणि जोरजोरात रडू लागला. 19 वर्षांचा धनुष हा अपमान सहन करू शकला नाही कारण सगळे त्याची चेष्टा करायचे.

# माधुरीने चालवली बोट



माधुरी दीक्षित सध्या तिच्या कुटुंबासोबत सुट्टी साजरी करत आहे. अलीकडेच त्यांचे पती डॉ. श्रीराम नेने यांनी व्हॅकेशन दरम्यानचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. ज्यामध्ये 56 वर्षीय माधुरी इटलीच्या लेक कोमोमध्ये स्पीड बोट चालवताना दिसत आहे. स्वत: डॉ.नेने यांनी हा सेल्फी व्हिडिओ शेअर केला आहे. यामध्ये माधुरी स्पीड बोट चालवत असून ते व्हिडिओ शूट करत आहेत. व्हिडिओमध्ये या दोघांसोबत त्यांच्या मुलाचीही झलक पाहायला मिळत आहे. व्हिडिओ शेअर करताना नेनेंनी कॅप्शनमध्ये लिहिले की, 'जेव्हा बॉस गाडी चालवतो'. लुकबद्दल बोलायचे झाले तर माधुरी काळ्या टॉपसह हिरव्या पँटमध्ये दिसली, यासोबत तिने टॉपवर प्रिंटेड शर्ट घातला आहे, ज्यामध्ये ती खूप सुंदर दिसत आहे. काळ्या गॉगलसह हा लूक पूर्ण केला आहे. तर तिचा नवरा काळ्या टी-शर्ट आणि सनग्लासमध्ये दिसत आहे. 'बॉस क्वीन टेक द व्हील' असे म्हणत चाहत्यांनी व्हिडिओवर प्रतिक्रिया दिली. आणखी एका यूजरने लिहिले की, 'माधुरी एक सदाबहार सौंदर्य आहे.' तिसऱ्याने लिहिले, 'वाह, खूप सुंदर मॅडम आणि खूप सुंदर कुटुंब'. यावर टिप्पणी करताना, आणखी एका वापरकर्त्याने म्हटले – सुंदर व्हिडिओ, माधुरी दीक्षित आणि डॉ. नेने यांची जोडी नंबर 1 आहे. वर्क फ्रंटवर, माधुरी दीक्षित शेवटची 'द फेम गेम'मध्ये दिसली होती. ही एक वेब सीरिज होती जी ओटीटीवर रिलीज झाली होती, या शोमध्ये मानव कौल, संजय कपूर यांच्यासोबत मुख्य भूमिकेत होते. याशिवाय मजा मां हा चित्रपटही प्रदर्शित झाला आहे.

# सामंथाचा आइस बाथ



साऊथची सुपरस्टार सामंथा रुथ प्रभू हिने सध्या प्रकृतीच्या कारणास्तव अभिनय जगतापासून ब्रेक घेतला आहे. अभिनेत्री सध्या सुटी घेऊन बाली इंडोनेशियामध्ये सुट्टी साजरी करत आहे. समंथा तिच्या सोशल मीडियावर तिच्या व्हॅकेशनमधील फोटो आणि व्हिडिओ सतत शेअर करत असते. तिने तिच्या इंस्टाग्रामवर आणखी एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये ती 4 डिग्री तापमानातआइस बाथ करताना दिसत आहे. व्हिडिओमध्ये सामंथा बाथटबमध्ये बसली आहे. ती या बर्फाळ पाण्यात सतत 6 मिनिटे राहिली. आईस बाथ स्नायू दुखणे आणि सूज दूर करण्यासाठी खूप फायदेशीर आहे. हा व्हिडिओ पोस्ट करत सामंताने कॅप्शन दिले, '#ICEBATH 4 डिग्री 6 मिनिटे. सामंथाने तिच्या अलीकडील प्रोजेक्ट्स सिटाडेल आणि कुशीचे शूटिंग पूर्ण केल्यानंतर कामातून ब्रेक घेतला आहे. अभिनेत्री जवळजवळ एक वर्षापासून मायोसिटिस नावाच्या ऑटोइम्यून रोगाशी झुंज देत आहे. आता तिला तिच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करायचे आहे. ज्या प्रकल्पांसाठी अभिनेत्रीने निर्मात्यांकडून आगाऊ फी घेतली होती, ते सर्व पैसे तिने निर्मात्यांना परत केले आहेत. सामंथा शेवटची पौराणिक चित्रपट शकुंतलमममध्ये दिसली होती, जो बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. तिच्या आगामी प्रोजेक्ट्सबद्दल बोलायचे झाले तर ती विजय देवरकोंडा सोबत कुशी या चित्रपटात दिसणार आहेयाशिवाय राज आणि डीके यांच्या सिटाडेल या मालिकेतही सामंथा दिसणार आहे. या मालिकेत सामंथासोबत वरुण धवन आहे.

# जान्हवी कपूरचा रॅम्पवॉक



फॅशन डिझाइन कौन्सिल ऑफ इंडिया (FDCI) द्वारे आयोजित इंडिया कॉउचर वीक 26 जुलैपासून सुरू झाला आहे. येथे इंडस्ट्रीतील सर्व मोठ्या डिझायनर्सनी त्यांचे कलेक्शन सादर केले. जान्हवी कपूर या कार्यक्रमात रॅम्पवर आली आणि फॅशन डिझायनर गौरव गुप्तासाठी शोस्टॉपर बनली. जान्हवीने निळ्या रंगाच्या लेहंग्यामध्ये रॅम्पवॉक केला. कार्यक्रमात जान्हवी शानदार निळ्या रंगाच्या लेहेंग्यात खूपच सुंदर दिसत आहे. तिने लेहेंग्यासोबत मॅचिंग स्ट्रेपी ब्लाउज आणि केप दुपट्टा घातला होता. अभिनेत्रीने न्यूड मेकअप आणि वेवी हेयर शैलीने या लुकला पूरक केले आहे. जान्हवीने अतिशय ग्रेस आणि ग्लॅमरसह रॅम्पवॉक केला. या कार्यक्रमातील जान्हवीचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत, ज्यावर तिचे चाहते कमेंट करत तिचे कौतुक करत आहेत. जान्हवीच्या व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'बॉलिवुडची हॉटेस्ट सेलिब्रिटी'. दुसऱ्याने लिहिले, 'वाह'. तिसऱ्या यूजरने कमेंट करताना लिहिले, ' ती खूप सुंदर दिसत आहे'. कमेंट करताना दुसऱ्या यूजरने लिहिले, 'वाह, खूप सुंदर रंग'. जान्हवी कपूरचा बावल हा चित्रपट 21 जुलै 2023 रोजी OTT प्लॅटफॉर्म AMAZON PRIME VIDEO वर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटातून जान्हवीने वरुण धवनसोबत पहिल्यांदा स्क्रीन शेअर केली आहे. याशिवाय जान्हवी लवकरच ज्युनियर एनटीआरच्या चित्रपटातून टॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. 'NTR 30' पुढील वर्षी 5 मार्च 2024 रोजी थिएटरमध्ये दाखल होणार आहे.

# प्रभासचे फेसबुक अकाउंट हॅक



गुरुवारी प्रभासचे अधिकृत फेसबुक अकाउंट हॅक झाले. प्रभासने इन्स्टाग्राम आणि ट्विटरवर ही माहिती दिली. आता त्याचे अकाउंट पूर्ववत करण्यात आले आहे. त्याने इन्स्टाग्राम आणि ट्विटरवर पोस्ट केले की त्याचे फेसबुक अकाउंट हॅक झाले आहे आणि त्याची टीम त्यावर काम करत आहे. प्रभासच्या फेसबुक अकाउंटवर जवळपास 24 मिलियन फॉलोअर्स आहेत. त्याचे अकाउंट हॅक झाल्याची माहिती देताना प्रभासने इंस्टाग्रामवर लिहिले - सर्वांना नमस्कार! माझे फेसबुक अकाउंट पेज हॅक झाले आहे. माझी टीम त्यावर काम करत आहे. गुरुवारी रात्री प्रभासच्या फेसबुक अकाउंटवरून दोन व्हिडिओ शेअर करण्यात आले. यातील एका व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये लिहिले होते – UNLUCKY HUMANS. तर दुसऱ्या व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये असे लिहिले आहे- बॉल फेल्स अराउंड द वर्ल्ड! या व्हिडिओंवर सोशल मीडिया यूजर्सनी प्रभासला ट्रोलही केले. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या आदिपुरुष या चित्रपटासाठी प्रभासला ट्रोल करताना एका यूजरने व्हिडिओवर लिहिले - दुर्दैवी आहेत ते लोक ज्यांनी आदिपुरुषला पाहिले. खाते पुनर्संचयित केल्यानंतर या टिप्पण्या देखील हटविल्या गेल्या आहेत.

# रोहित शर्माचा ढोंगीपणा!

## » वनडे सामन्यानंतर रोहित शर्मावर चाहत्यांची सडकून टीका

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**बार्बाडोसच्या ब्रिजटाऊन येथील केन्सिंग्टन ओव्हल येथे गुरुवारी एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना खेळला गेला. या सामन्यात भारताने वेस्ट इंडिजचा पाच गडी राखून पराभव केला. त्याचबरोबर मालिकेत १-० ने आघाडी घेतली. या सामन्यात कुलदीप यादव, रवींद्र जडेजा आणि इशान किशनने शानदार प्रदर्शने केले. दरम्यान या सामन्यात सूर्यकुमार यादव अपयशी ठरला. या सामन्यानंतर कर्णधार रोहित शर्मावर चाहते सडकून टीका करत आहेत.**




तथापि, या सामन्यातील टीम इंडियाची प्लेइंग इलेव्हनमध्ये संजू सॅमसनला संधी न दिल्याने चाहते नाराज झाले होते. मात्र त्यानंतर सूर्यकुमार यादवच्या आणखी एका खराब प्रदर्शनानंतर संजू सॅमसनकडे दुर्लक्ष केल्याबद्दल चाहते रोहित शर्मावर संतापले असून सोशल मीडियावर व्यक्त होत आहेत. त्याचबरोबर त्याचा जुना व्हिडीओ शेअर त्याच्या ढोंगीपणाचा निषेध करत आहेत. एकदिवसीय मालिका ही सॅमसनला भारताच्या विश्वचषक संघात आपले स्थान निश्चित करण्याची शेवटची संधी आहे. या वर्षाच्या सुरुवातीला दुखापतीमुळे स्पर्धांना मुकल्यानंतर सॅमसनला वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी संधी देण्यात आली आहे. जेव्हा ऋषभ पंतच्या अनुपस्थितीत त्याला प्रथम-पसंतीचा यष्टीरक्षक म्हणून निवडले जाईल अशी अपेक्षा होती, तेव्हा त्याच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

### संजू सॅमसनकडे दुर्लक्ष

रोहित शर्माच्या निर्णयावर चाहते संतप्त झाले असून त्यांनी सामन्यानंतरच्या टिप्पणीवर टीका केली आहे. रोहित शर्मा सामन्यानंतर म्हणाला होता की, 'आलेल्या एकदिवसीय खेळाडूंना खेळण्यासाठी वेळ द्यायचा आहे.' दरम्यान सूर्यकुमार पुन्हा एकदा फॉरमॅटमध्ये त्याची योग्यता सिद्ध करण्यात अपयशी ठरला. या वर्षाच्या सुरुवातीला सलग तीन सामन्यात शून्यावर बाद झाला होता. आता तो वेस्ट इंडिजविरुद्धच्या सामन्यात २५ चेंडूत केवळ १९ धावा करू शकला. या वर्षाच्या सुरुवातीला दुखापतीमुळे स्पर्धांना मुकल्यानंतर सॅमसनला वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी संधी देण्यात आली आहे. जेव्हा ऋषभ पंतच्या अनुपस्थितीत त्याला प्रथम-पसंतीचा यष्टीरक्षक म्हणून निवडले जाईल अशी अपेक्षा होती, तेव्हा त्याच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

# रवींद्र जडेजाने रचला इतिहास

## » कपिल देव आणि अनिल कुंबळेला टाकले मागे

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारत आणि वेस्ट इंडिज संघांत सध्या तीन सामन्यांची वनडे मालिका खेळली जात आहे. या मालिकेतील पहिला सामना गुरुवारी पार पडला. पहिल्या सामन्यात यजमान वेस्ट इंडिज संघाचा ५ विकेट्सने धुव्वा उडवला. या सामन्यात टीम इंडियाचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाने तीन विकेट्स घेत एका मोठ्या विक्रमाला गवसनी घातली. त्याने हा पराक्रम करताना कपिल देव आणि अनिल कुंबळे यांना मागे टाकले आहे.**

या सामन्यात टीम इंडियाने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय योग्य ठरला आणि वेस्ट इंडिजचा संघ अवघ्या २३ षटकांत ११४ धावांत सर्वबाद झाला. टीम इंडियाच्या गोलंदाजांनी आपल्या शानदार कामगिरीच्या जोरावर अनेक मोठे विक्रम मोडीत काढले. त्यानंतर भारतीय संघाने प्रत्युत्तरात २२.५ षटकांत ५ विकेट्स गमावून ११८ धावा करत विजय नोंदवला. वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात रवींद्र जडेजाने इतिहास रचला आहे.




जडेजा आता वेस्ट इंडिजविरुद्ध भारताकडून सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज बनला आहे. जडेजाच्या आता वेस्ट इंडिजविरुद्ध ४४ विकेट्स आहेत. त्याने माजी भारतीय कर्णधार कपिल देव (४३) यांना मागे टाकले आहे. त्याचवेळी जडेजाने याच सामन्यात ४१ बळी घेणाऱ्या अनिल कुंबळेलाही मागे टाकले. याशिवाय मोहम्मद शमीचे नावही या यादीत आहे. शमीने वेस्ट इंडिजविरुद्ध ३७ विकेट घेतल्या आहेत. या यादीत पाचवे नाव हरभजन सिंगचे आहे. हरभजनने वेस्ट इंडिजविरुद्ध एकूण ३३ विकेट घेतल्या आहेत. या यादीत जडेजा अव्वल असून आता या मालिकेत आणखी दोन सामने बाकी आहेत. अशा स्थितीत जड्डूला आपली आघाडी आणखी वाढवण्याची चांगली संधी आहे.

### कुलदीप यादवने घेतल्या 4 विकेट्स

पहिल्या सामन्यात यजमान वेस्ट इंडिज संघाचा ५ विकेट्सने धुव्वा उडवला. या सामन्यात टीम इंडियाचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाने तीन विकेट्स घेत एका मोठ्या विक्रमाला गवसनी घातली. भारताकडून कुलदीप यादवने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर जडेजानेही ३ विकेट्स घेतल्या. याशिवाय शार्दुल ठाकूर, मुकेश कुमार आणि हार्दिक पांड्या यांनी १-१ विकेट घेतली.

# रिकी पाँटिंगवर फेकली द्राक्षे

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

अ‍ॅशेस मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात ओव्हल मैदानावर खेळला जात आहे. या सामन्याच्या पहिल्या दिवशीचा खेळ संपल्यानंतर स्टेडियममध्ये उपस्थित प्रेक्षकांनी ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पाँटिंगसोबत गैरवर्तन केले.

यामुळे पाँटिंग चांगलाच संतापलेला दिसत होता. लंडनमध्ये खेळल्या जात असलेल्या सामन्यात रिकी पाँटिंग पहिल्या दिवसाच्या खेळावर प्रतिक्रिया देत होता आणि सीमारेषेजवळ माईक घेऊन मैदानावर उभा होता. दरम्यान, स्टँडवर उपस्थित काही प्रेक्षकांनी त्याच्यावर द्राक्षे फेकली.

ओव्हल कसोटीच्या पहिल्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर पाँटिंग मैदानावर उभा राहून थेट कॉमेंट्री करत होता. त्याचवेळी, वरील स्टँडमध्ये उपस्थित असलेल्या चाहत्यांनी त्याच्यावर द्राक्षे फेकली. पाँटिंगला ही कृती अजिबात आवडली नाही. कार्यक्रमाच्या सूत्रधारांनी हे प्रकरण शांत करण्याचा प्रयत्न केला, पण पाँटिंग शांत होण्यास तयार नव्हता.

लाइव्ह कॉमेंट्रीमध्ये तो म्हणाला, 'काही लोकांनी माझ्यावर द्राक्षे फेकली. हे लोक कोण आहेत हे शोधण्यात मला काहीच अडचण नाही. इंग्लंडच्या चाहत्यांची ही कृती ऑस्ट्रेलियन चाहत्यांना आवडली नाही आणि सोशल मीडियावर दोघांमध्ये युद्ध सुरू झाले. दोघांनी एकमेकांना ट्रोल करायला सुरुवात केली. ऑस्ट्रेलियन चाहत्यांनी इंग्लंडच्या बार्मी आर्मीला खिलाडूवृत्तीची आठवण करून दिली.